# हिंगोली जिल्ह्यातील नगर परिषदांच्या उत्पन्नाचे विश्लेषण (सन २०१०-११ ते २०१२-१३)

**गजानन संभाजीराव देशमाने**
संशोधक विद्यार्थी,
सामाजीक शास्त्रे विद्या संकुल,
स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

**डॉ.जे.एस.भोयर**
प्राचार्य व संशोधक मार्गदर्शक,
कै.बाबुराव पाटील कला व विज्ञान
महाविद्यालय,हिंगोली.

**प्रस्तावना:**

नागरी स्थानिक स्वराज्य संस्था लोकशाहीचा तसेच केंद्रिय शासनाच्या आधार असतात.स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे असे शासन की,ज्यात प्रतिनिधींची नेमणूक जनतेद्वारे केली जाते.या संस्था राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली कार्य करतात.नगर परिषदांचा कारभार लोकनियुक्त प्रतिनिधीमार्फत चालविला जातो. अशा लोकप्रतिनिधींनी मिळुन जे कोन्सिल बनत असते त्यास नगर परिषद कौन्सिल म्हणतात.नगरांचे प्रश्न व समस्या सोडविण्याच्या कामात पर्यावरण,बांधकाम आरोग्य,रस्ते,वीज इ.कामामध्ये नगर प्रशासनाची महत्त्वाची भूमिका असते.वाढती लोकसंख्या आणि लोकांच्या वाढत जाणाऱ्या अपेक्षा यांचा विचार करता नगर परिषदांच्या खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसते.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.त्यानंतर नगर परिषदांच्या निर्मितीसाठी १९६५ साली महाराष्ट्र नगर परिषद,नगर पंचायाती व औद्योगिक नगरी अधिनियम तयार करण्यात आला.नागरी स्थानिक संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यासाठी ७४ व्या घटना दुरुस्ती विधेयक तयार करण्यात आले.७४ व्या घटना दुरुस्ती अधिनियमाच्या माध्यमातुन भारतीय राज्यघटनेत भाग ९अ नगर पालिका शिर्षकाने जोडण्यात आले.हिंगोली जिल्हामध्ये तीन कळमनुरी नगर परिषद क वर्ग आहे.तसेच नव्याने स्थापन केलेल्या औंढा (नागनाथ) व सेनगांव येथे नगर पंचायत आहे.

**अध्ययन पध्दत :**

सदरील विश्लेषण हे द्वितीय स्त्रोतांवर आधारित आहे.त्यासाठी नगर परिषदांच्या अंदाजपत्रकांचा व नगर परिषद प्रशासन संचालनालयाच्या संकेत स्थळाचा आधार घेण्यात आला.

**गृहीत :** १) नगर परिषदा सहाय्यक अनुदानावर अवलंबुन आहेत.
२) नगर परिषदेच्या उत्पन्नात शासनाच्या सहाय्यक अनुदानाचे प्रमाण अधिक आहे.

**हिंगोली जिल्हा :**

परभणी जिल्ह्याचे विभाजन होवून १ मे १९९९ रोजी हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाली.जिल्ह्याचे मुख्यालय हिंगोली येथे असून जिल्ह्यात हिंगोली,कळमनुरी,वसमत,औंढा (नाग.),सेनगांव हे पाच तालुक्याची ठिकाणे आहेत.जिल्ह्यांचे क्षेत्रफळ ४,८२७/- चौ.कि.मी.असुन ते महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत १.५७% इतके येते.

२०११ च्या १५ व्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ११,७७,३४५ आहे.तर जिल्ह्यातील एकूण नागरी लोकसंख्येपैकी हिंगोली शहरात ४७.६१%,वसमत शहरात ३८.५२% तर कळमनुरी शहरात १३.८६% लोक राहतात.तर तालुकानिहाय साक्षरतेची टक्केवारी हिंगोली ८०.३२%, कळमनुरी ७८.५९%, वसमत ७७.६२%, औंढा नागनाथ ७५.७९ % व सेनगांव ७७.७१% या प्रमाणे आहे.

**ब- वर्ग नगर परिषदांचे उत्पन्न (हिंगोली व वसमत नगर परिषद)**

राज्यातील नगर परिषदांचा जकात कर व महागाई भत्ता रद्द केल्यामुळे त्याऐवजी सदर नगर परिषदांना सहाय्यक अनुदान वितरीत करण्यात येते.तसेच मालमत्ता कर,शुल्क,पाणीपट्टी,वित्त आयोगाद्वारे मिळणारा निधी इ.बाबी ह्या नगर परिषदांच्या साधनांमध्ये आहेत.

जिल्ह्यातील ब वर्ग नगर परिषदांच्या उत्पन्नातील शुल्क,मालमत्ता कर,सहाय्यक अनुदान व वित्त आयोग वा बाबींपासुन मिळणारे उत्पन्न खालील तक्ता क्र.१ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र.१**

**उत्पन्नाच्या बाबी**

| | | हिंगोली नगर परिषद | | | वसमत नगर परिषद | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **खाते शिर्षक** | **२०१०-११** | **२०११-१२** | **२०१२-१३** | **२०१०-११** | **२०११-१२** | **२०१२-१२३** |
| १ | शुल्क | १६१९०३८६ | ७४२७५९१ | ७४४१३५१ | ९८३३१२ | ९४७७७१ | **१६१४२०२** |
| २ | मालमत्ता कर | १०४०४४१० | १२०१७६२० | १३३०९६२५ | ५८७००८० | ५६५८३०१ | **८३०८८६३** |
| ३ | सहाय्यक अनुदान | ४९०३०००० | ४३७७२००३ | ५५३५३००० | ४६१२२००० | ६२०७९००० | **५१४३३०००** |
| ४ | १३ वा वित्त आयोग | ४३६८१५१ | ११६३१३८१ | ९०९७६१४ | ०० | १३८९२४१३ | **८५९०४४७** |
| | **एकूण** | **७९९९२९४७** | **७४८४८५९५** | **८५२०१५९०** | **५२९७५३९२** | **८२५७७४८५** | **६९९४६५१२** |

(**आधार :** नगर परिषदांचे वार्षिक अंदाज पत्रके.)

वरील तक्ता क्र.१ वरुन असे स्पष्ट होते की,हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली न.प. व वसमत न.प.यांच्या उत्पन्नात शुल्क,मालमत्ता कर,सहाय्यक अनुदान व १३ व्या वित्त आयोगाकडुन मिळणाऱ्या उत्पन्नाचे आकडे दर्शविले आहे. सन २०१०-११ मध्ये हिंगोली नगर परिषदेत ६१% प्रमाण सहाय्यक अनुदानाचे आहे.तर मालमत्ता करापासुन १३% उत्पन्न न.प.मिळाले.तर १३ व्या वित्त आयोगापासुन ६%उत्पन्न मिळाले.सन २०११-१२ मध्ये सहाय्यक अनुदानापुन ५८.४८%उत्पन्न मिळाले.व मालमत्ता करापासुन १६.०५% उत्पन्न होते.२०१२-१३ मध्ये सहाय्यक अनुदानापासुन उत्पन्नातील वाटा हा ६४.९६% आहे व मालमत्ता कराचा उत्पन्नामधील वाटा १५.६२% होता.

वसमत नगर परिषदेस वरील चार उत्पन्नाच्या बाबींमधुन सन २०१०-११ मध्ये मालमत्ता करातून मिळालेल्या उत्पन्नाचे प्रमाण हे ११.०८% होते.सहाय्यक अनुदानापासुन मिळणारा निधी ८५.०६% होता.तर २०११-१२ मध्ये मालमत्ता करापासुन मिळणारे उत्पन्न ६.८५% होते.याच वर्षी सहाय्यक अनुदानातुन येणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण हे ७५.१७% होते. तर सन २०१२-१३ मध्ये मालमत्ता कराचा एकुण उत्पन्नातील वाटा हा ११.८७% होता व सहाय्यक अनुदानाचे प्रमाण हे ७३.५३% होते.थोडक्यात वरील उत्पन्नाच्या बाबींमधुन असे स्पष्ट करता येते की,हिंगोली व वसमत नगर परिषदेत एकुण उत्पन्नात सहाय्यक अनुदानाचे प्रमाण हे सन २०१०-११ ते २०१२-१३ या कालखंडात सर्वाधिक आहे.

क वर्ग नगर परिषदेचे उत्पन्न (कळमनुरी नगर परिषद)

कळमनुरी नगर परिषद क वर्ग आहे.सन २०१०-११ ते २०१२-१३ मध्ये खालील तक्त्यामध्ये उत्पन्नाचे स्पष्टीकरण केले आहे.

**कळमनुरी नगर परिषदेचे उत्पन्न**

**तक्ता क्र.२**

| **अ.क्र.** | **खाते शिर्षक** | **२०१०-११** | **२०११-१२** | **२०१२-१३** |
|---|---|---|---|---|
| १ | नगर पालिका दर व कर | १३९५४३९ | ११४८३६५ | **३४४५०००** |
| २ | मालमत्ता कर | १२९७२७१ | १९९३४६९ | **३४१००००** |
| ३ | अनुदाने व अंशदाने | ३९४२१३७५ | ३९१४३०२५ | **४२१६५०००** |
| ४ | संकीर्ण | ४१९६६५ | २४००६७३ | **७४६००००** |
| | **एकूण उत्पन्न** | **४३३८३०८२** | **४४६८५५३२** | **५६६४६०००** |

(**आधार :** नगर परिषदांचे अंदाजपत्रक २०१०-११,२०११-१२,२०१२-१३)

**टिप :** एकूण उत्पन्नात मागील वर्षाची शिल्लक मिळविलेली आहे.

वरील तक्ता क्र.२ मध्ये कळमनुरी नगर परिषदेचे तीन तीन वर्षाचे उत्पन्न दर्शविले आहे.नगर पालिकेस सन २०१०-११ मध्ये मालमत्ता करापासुन मिळणारा उत्पन्नाचा वाटा हा फक्त २.९९% आहे.तर अनुदान व अंशदानापासुन मिळणारा वाटा सर्वाधिक ९०.८६% होता.सन २०११-१२ मध्ये एकूण उत्पन्नात मालमत्ता कराचे प्रमाण ४.४६% आहे व अनुदानापासुन मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण हे ८७.५९% होते.तर सन २०१२-१३ मध्ये अनुदान व अंशदानापासुन मिळणारे उत्पन्न हे एकूण उत्पन्नाच्या ७४.४३%

होते.म्हणजेच कळमनुरी नगर परिषदेस मिळणाऱ्या एकूण उत्पन्नात अनुदाने व अंशदानाचे प्रमाण अधिक असुन मालमत्ता कराचे उत्पन्नातील प्रमाण कमी आहे.

हिंगोली जिल्ह्यातील नगर परिषदांच्या उत्पन्नात सहाय्यक अनुदानाचे प्रमाण अधिक असुन मालमत्ता करापासुन मिळणारे उत्पन्न कमी दिसुन येते.त्यामुळे वरील गृहीत म्हणजे नगर परिषदेच्या एकूण उत्पन्नात सहाय्यक अनुदानाचे प्रमाण अधिक आहे हे खरे ठरते.

**संदर्भ:**

१. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-२०१६ जिल्हा हिंगोली.
२. अर्थ व सांख्यिकी संचालनालय,महाराष्ट्र राज्य.
३. महाराष्ट्र नगर परिषदा,नगर पंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम,१९६५
४. वार्षिक अंदाजपत्रके (हिंगोली,कळमनुरी व वसमत नगर परिषद)
५. नगर परिषद प्रशासन संचालनालय,महाराष्ट्र राज्य.
६. www.maharashtra.gov.in
७. www.mahadma.maharashtra.gov.in
8. हिंगोली जिल्ह्यातील नगर परिषदांचे संकेतस्थळ.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com